MHJN060007382018



न्यायनिर्णय निशाणी क्र. ११ खाली
(पारीत दिनांक १७.११.२०२१)

अभियोग पक्षाचा पुरावा व आरोपीचा बचाव लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थीत होतात. मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १२.१२.२०१७ रोजी १७.१५ वाजेच्या सुमारास मौजे राजूर ते चनेगाव रोडवर तुम्ही आरोपी विनापरवाना चोरटी वाहतूक करण्याच्या उद्देशाने देशी दारूच्या १८० मि.ली. चे ०७ नग बाळगून असल्याचे मिळू आले ? | नकारार्थी |
| २) | काय आदेश | आरोपी दोषमुक्त |

**का र ण मि मां सा**

**मुददे क्रमांक १ व २ करीताः–**

२. सदर प्रकरणात अभियोगपक्षातर्फे फक्त दोन पंचसाक्षीदार म्हणजे सरकारी साक्षीदार क्र. १ भाउसोहब सांडूजी गंगावने व साक्षीदार क्र. २ सुधाकर बंडू मगरे यांना तपासण्यात आले. या खटल्यातील महत्वाचे साक्षीदार तपासून झाल्यानंतर निशाणी क्रमांक १ वर पारीत, अभियोग पक्षाचा पुरावा बंद

करण्यात आला व आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

३. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील ए. यु. वानखेडे मॅडम व श्री. पी. एन. कड यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रकरणातील साक्षीदार क्र. १ भाउसोहब सांडूजी गंगावने व साक्षीदार क्र. २ सुधाकर बंडू मगरे यांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केलेले नाही. उपरोक्त दोन्ही साक्षीदारांनी पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कारवाई केली नाही, जप्ती पंचनाम्यावर भाउसाहेब याने तो रस्त्याने जात असतांना व साक्षीदार सुधाकर याने त्याची सही पोलीसांनी तो दुकानावर हजर असतांना घेतल्याचे सांगितले व जप्ती पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहित नसुन इतर सुचक प्रश्नांची त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

५. उपरोक्त दोन्ही पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत होईल अशी साक्ष दिली नाही. सदरील दोन्ही साक्षीदारांनी पंचनाम्यावर त्यांच्या सहया असल्याचे सांगितले परंतू त्यातील मजकूर स्पष्टपणे नाकारला आहे. त्यामूळे पंच साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, जप्तीपंचनामा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्ष असफल ठरला. तसेच अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार, फिर्यादी व तपासी अधिकारी यांना तपासले नाही. अभियोगपक्षाने सदरहु खटल्यात रासायनिक परिक्षण अहवाल सादर केला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून दारु जप्त झाली असे स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिध्द न झाल्याने आरोपीच्या ताब्यातून दारु मिळून आली असा निष्कर्ष काढता येणार नाही. यावरुन अभियोगपक्षाच्या कथनाबाबत संशय निर्माण होतो आणि परिणामी मी मुददा् क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते आणि

मुददा् क्रमांक २ च्या अनुषंगाने आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी नितीन अशोक खरात याची कलम ६५(अ)(ई) मुंबई दारुबंदी कायदयातून कलम २५५(१) फौजदारी प्रक्रीया संहितेनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक व जमानतपत्र पुढील सहा महिन्यापर्यंत कायम ठेवण्यात येते.

३. जप्त मुददेमाल देशी दारूचे १८० मि.ली. चे ०७ नग आव्हानकाळा नंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला आहे.

स्वाक्षरित/—
(कु. एस.एस. बजाज )
दि.१७.११.२०२१. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१),भोकरदन

संक्षिप्त फौ. केस क्र.२६३/२०१८
शासन–वि–नितीन

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | यु. आर. दसरे |
| न्यायालयाचे नाव | : | दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन |
| मा. साहेबांनी चेक केले व पी. डी. एफ. दिनांक | : | १७.११.२०२१ |

स्वाक्षरित/—
लघुलेखकाची सही